# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२/०००७.

तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org.in


कार्यालयीन आदेश

क्रमांक : ४अ/आस्था/२००९/कंपुनि/ ८३५

दिनांक : २८.०४.२०१०

पहा : १. शासन निर्णय क्रमांक कंत्राटी २००७/(७७/०७)/तांशि-२, दिनांक ०५.०५.२००७

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४अ/आस्था/२००८/२९५८, दि ०२.०४.२००८

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४अ/आस्था/रसायनशास्त्र/२००८/२९५९, दि ०२.०४.२००८

४. शासन निर्णय क्रमांक एससीटी ६५०९/(२१/०९)/तांशि-१, दिनांक २४.११.२००९

शासकीय तंत्रनिकेतनातील अध्यापकांची रिक्त पदे ऑन लाईन ॲप्लीकेशन रिसीप्ट पध्दतीने कंत्राटी तत्वावर भरण्यास संदर्भीन क्रमांक १ मधील आदेशातील अटी व शर्तीच्या दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संदर्भ क्रमांक २ व ३ च्या आदेशान्वये कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सदर नियुक्त केलेल्या कंत्राटी अध्यापकांच्या करारपत्रानुसार सेवा समाप्त केल्यानंतर ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे, अशा उमेदवारांना संदर्भ क्रमांक ४ अन्वये निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार शासकीय तंत्रनिकेतनातील संदर्भ क्रमांक २ व ३ च्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यरत कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांनी दिलेल्या हमीपत्रानुसार विहित मुदतीत समाप्त करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे **सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर** यांच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनातील सेवा समाप्त केलेल्या कंत्राटी अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे अशा कंत्राटी अध्यापकांना रुपये **१२०००/- या ठोक वेतनावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थेत या आदेशान्वये दिनांक २४.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर पुर्ननियुक्ती करीत आहेत.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पुर्ननियुक्तीचे पद | पुर्ननियुक्तीची ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री बी पी देशमुख | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण |
| २. | श्री ए एम घुले | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण |
| ३. | श्रीमती सुप्रिया संजय रोटे | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर |
| ४. | श्रीमती संगिता जयवंत मुनावळी | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर |
| ५. | श्रीमती वर्षा प्रमोद देशपांडे | अधिव्याख्यता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर |
| ६. | श्री एन एस वडतकर | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली |
| ७. | श्री नवरखेळे मिलींद भास्करराव | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद |
| ८. | श्री एस एम चित्रीव | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपूरी |
| ९. | श्री ए एम दाभाडे | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली |
| १०. | श्री जी आर येरावार | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव |
| ११. | कु रजनी ज्ञा मेतकर(रजनी अनंत नेमाडे) | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव |
| १२. | श्री जी पी उरकुडे | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील पुनर्नियुक्त्या पुढील अटींच्या अधीन राहुन करण्यात येत आहेत.

१. **कंत्राटी तत्वावर वरील अध्यापकांच्या नियुक्त्या दिनांक २४.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमीत स्वरुपात उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.**

२. वरील अध्यापकांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती रुपये १२०००/- (रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जोडपत्रातील करारनामा कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी संबंधित संस्थेत लिहून द्यावा लागेल, अन्यथा त्यांचे नियुक्ती आदेश रद्द ठरतील.

४. **कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या सेवा बदलीपात्र राहणार नाहीत. मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्‌भवल्यास त्यांची इतर शासकीय तंत्रनिकेतनात बदली करण्यात येईल.**

५. **कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांचे शैक्षणिक / अध्यापनाचे काम समाधानकारक असण्यावर अवलंबून राहतील व कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.**

६. कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांविरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. कंत्राटी तत्चार नियुक्त करण्यात आलेल्या अध्यापकांनी या आदेशाच्या दिनांकापासून ४ दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रूजू होणार नाहीत त्यांचा नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्टात येईल, त्याबाबत पुनर्विचार करण्यात येणार नाही.

८. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टांत येतील.

९. कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या अध्यापकांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्याने संबधीतांना नियमित नियुक्तीधारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. कंत्राटी तत्वावर नियुक्त असलेल्या अध्यापकांनी अध्यापनाबरोबरच सोपविलेली तद्‌नुषंगिक इतर प्रशासकीय कामे करणे बंधनकारक राहील.

११. कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या अध्यापकांनी, त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र त्यांनी स्वतंत्रपणे प्राचार्यांकडे सादर करणे अनिवार्य आहे.

१२. प्रस्तुत नियुक्त्या हया नव्याने करण्यात येत असून त्या निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधित उमेदवारांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत. तसेच यापूर्वीच्या कंत्राटी सेवेचा कोणताही लाभ त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

१३. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्याप्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल.

**( डॉ सु का महाजन )**
**प्र संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, मालवण / कोल्हापूर / सोलापूर / खामगांव / यवतमाळ / नागपूर / साकोली / ब्रम्हपूरी /गडचिरोली (मानार्थ )(संबंधित प्राचार्यामार्फत)

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

३. शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मालवण / कोल्हापूर / सोलापूर / खामगांव / यवतमाळ / नागपूर / साकोली / ब्रम्हपूरी /गडचिरोली,

त्यांना कळविण्यात येते की, कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांचा शिकविण्याचा वस्तुनिष्ठ अहवाल दर ३ महिन्यांनी संबंधित विभागप्रमुखांमार्फत संचालनालयास सादर करावा.

४. संबंधित उमेदवार (पुनर्नियुक्ती दिलेल्या संबंधित संस्थेच्या प्राचार्यामार्फत)

५. कार्यासन क्रमांक ४अ , मुख्य कार्यालय मुंबई (निवड नस्ती )

६. कार्यासन अधिकारी, का.क्र.२, आय.टी. विभाग, मु.का.मुंबई.

सदर कार्यालयीन आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करावा.